नि.दि.मु.क्र. - २५/२०१७.
गणेश वि. हौसाबाई व इतर.
नि. ५.

MHST160000862017

:: **आ दे श** ::

१. अर्ज वाचला. प्रतिवादी क्र. १ व २ यांचा नि. ३९ वरील जबाब वाचला. वादी तर्फे ॲड. एस. डी. खामकर व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे तर्फे ॲड. एस. एस. मोरे यांचा युक्तीवाद ऐकला.

२. मौजे चिंधवली तालुका वाई येथील शेत जमीन गट क्र. ४१२/ई/३, ४१२/फ/१९ व ४१२/फ/२४ तसेच मौजे भिवडी पुनर्वसन तालुका वाई येथील ग्रामपंचायत घर मिळकत क्र. ४५ बाबत वादीने कायम मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता तसेच सरस निरस मानाने वाटप करणे करीता दावा दाखल केला आहे. या दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यंत प्रतिवादी क्र. १ हीने वाद मिळकत त्रयस्थ इसमास हस्तांतरीत करु नये तसेच वाद मिळकती मध्ये त्रयस्थ इसमाचा हक्क प्रतिवादी क्र. १ हिने प्रस्थापित करावा म्हणुन प्रतिवादी क्र. २ प्रकाश याने तिचेवर दबाव टाकु नये म्हणुन त्या दोघां विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा, याकरीता वादीने दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ३९ नियम १ नुसार हा अर्ज सादर केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि. ३९ वर त्यांचा जबाब दाखल केला आहे व या अर्जास विरोध दर्शवुन हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व नि. ३९ वरील जबाबातील मजकुरा वरुन हा अर्ज निकाली

काढणे कामी मी खालील मुद्दे निश्चित केलेले आहेत व त्याची कारणमिमांसा खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय ? | ... नाही. |
| २. | अनुकुलतेचा समतोल वादीचे हक्कात आहे काय ? | ... नाही. |
| ३. | अर्ज नामंजुर केला तर वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... नाही. |
| ४. | काय आदेश ? | ... अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

**:: <u>का र ण मि मां सा</u> ::**

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u>** –

५. वादीचे कथना नुसार वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुटुंबाची अविभक्त मिळकत आहे. लक्ष्मण वाघु मालुसरे हा वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाचा मुळ पुरुष होता. लक्ष्मण मालुसरे हा सन २०१२ साली मरण पावला आहे. प्रतिवादी क्र. १ हौसाबाई ही लक्ष्मणची पत्नी आहे. लक्ष्मण व हौसाबाई यांना सोनाबाई (मयत), रामचंद्र (मयत), प्रकाश (प्रतिवादी क्र. २) व राजेंद्र (मयत) ही अपत्ये आहेत. वादी, प्रतिवादी क्र. ८ शितल व प्रतिवादी क्र. ९ प्रशांत

मयत राजेंद्र याचे वारस आहेत. प्रतिवादी क्र. ३ नंदा ही मयत रामचंद्र याची वारस आहे. प्रतिवादी क्र. ४ ते ७ हे सुध्दा मयत रामचंद्र याचे वारस आहेत.

६. वादीचे कथना नुसार वाद मिळकती मध्ये वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. असे असतानाही वाद मिळकतीचे महसुल अभिलेखास प्रतिवादी क्र. १ हौसाबाई हिचे नावाची नोंद असल्यामुळे त्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र. १ व २ हे सदरची मिळकत त्रयस्थ इसमास हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नामध्ये आहेत. वादीस वाद मिळकतीमध्ये त्याचा कायदेशीर हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वाद मिळकतीमध्ये जर त्रयस्थ इसमाचा हक्क प्रस्थापित केला तर वादीचे अपरीमित नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादीचे हक्कात प्रथम दर्शनी केस आहे. जर हा अर्ज मंजुर केला तर प्रतिवादींचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही. सबब, हा अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादीने केली आहे.

७. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कथना नुसार वादीने मयत प्रकाश याच्या दोन मुली दाव्यात समाविष्ट केलेल्या नाहीत तसेच दाव्याचे मुल्यांकन बरोबर केले नाही त्यामुळे या दोन कारणा वरुन हा दावा खारीज होण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र. १ हौसाबाई हीस वाद मिळकत तिचे माहेराहुन मिळालेली आहे. त्यामुळे वाद मिळकतीची ती अबाधित absolute मालक आहे. प्रतिवादी क्र. १ हौसाबाई ही वाद मिळकतीची अबाधित मालक असल्यामुळे वादीस हा दावा दाखल करण्याचा अधिकार नाही तसेच वादीस या मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा मिळणार नाही. सबब, या कारणास्तव हा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

८. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचा युक्तीवाद ऐकल्या नंतर मी दावा, नि. ३९ वरील जबाब व दावा मिळकतीचे ७/१२ उता-यांचे तसेच घर

मिळकतीचे नमुना क्र. ८ उता–याचे अवलोकन केले आहे. निःसंशय वाद मिळकतीचे महसुल अभिलेखास याक्षणी प्रतिवादी क्र. १ हौसाबाई हिचे नावाची नोंद दिसुन येत आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे वाद मिळकत कोणत्या त्रयस्थ इसमास हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नामध्ये आहेत, याबाबत वादीने याक्षणी पुरावा दाखल केलेला नाही. मौजे चिंधवली येथील वाद शेत मिळकतीचे ७/१२ उता–यांचे अवलोकन केले असता सदरच्या मिळकती वर्ग २ च्या असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे या मिळकती तबदीली करण्यास सक्षम अधिका–याची पुर्व परवानगी आवश्यक आहे याबाबत वाद नाही.

९. वाद मिळकतींचे स्वरुप हे वादी म्हणतो तसे वडीलोपार्जित आहे की प्रतिवादी क्र. १ व २ यांचे म्हणणे नुसार वाद मिळकती हया प्रतिवादी क्र. १ हौसाबाई हिचे अबाधित मालकीच्या आहेत, हा पुराव्याचा भाग आहे. त्याबाबत याक्षणी निष्कर्ष काढणे उचित होणार नाही, असे न्यायालयाचे मत आहे. वादीस वाद मिळकतीमध्ये कायदेशीर हिस्सा आहे का नाही, हा पुराव्याचा भाग आहे. वाद मिळकतीमध्ये वादीस कायदेशीर हिस्सा आहे, असे वादीचे कथन आहे म्हणुन केवळ त्या कारणा वरुन हा अर्ज मंजुर करणे उचित होणार नाही, असे न्यायालयाचे मत आहे. वादीचे हक्कात कोणत्याही प्रकारे प्रथम दर्शनी केस दिसुन येत नाही. अर्ज नामंजुर केला तर वादीचे कोणत्याही प्रकारे नुकसान होण्याची शक्यता दिसुन येत नाही. सबब, त्यामुळे अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत करत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>** –

१०. मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत केल्यामुळे मुद्दा क्र. ४ करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## :: **<u>आदेश</u>** ::

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

Digitally signed by Vyankatesh Nagnath Girwalkar
Date: 2021.03.23 14:03:30 +0530

ठिकाण : वाई. (व्ही. एन. गिरवलकर)
दिनांक : २३.०३.२०२१. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाई.

## :: **<u>C E R T I F I C A T E</u>** ::

" I certify that this Judgment / Order uploaded is a true and correct copy of original signed Judgment / Order.

Order directly dictated on : 23.03.2021.

Order checked and signed on : 23.03.2021.

Uploaded by : A. M. Agawane.
(Stenographer) Grade III.

Uploaded on : 23.03.2021.